भारती विदयापीठ पोलीस ठाणे,पुणे.
दिनांक – ०३/०२/२०१७

- प्रेसनोट –

मध्यरात्री बंद दुकानाचे शेटर उचकटुन घरफोडी चोरी करणारा पुणे शहरातील सराईत गुन्हेगार अखेर भारती विदयापीठ पोलीसाकडुन जेरबंद

---

दिंनाक – ०१/०२/२०१७ रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री विंजयसिंह गायकवाड सो यांच्या आदेशाने भारती विदयापीठ पोलीस स्टेशनच्या हददीत पोलीस उपनिरिक्षक समाधान कदम व तपास पथकातील कर्मचारी असे भारती विदयापीठ पोलीस ठाणे हहदीत पुणे महानगर पंलिका निवडणुक २०१७ च्या अनुषंगाने पेट्रोलिंग करत असताना पोलीस नाईक सरफराज देशमुख यांना त्याच्या बातमीरामार्फत बातमी मिळाली की, मोटार सायकल चोरी करुन वापरत असणारा एक इसम डॉलफिन चौकाच्या जवळ, बिबवेवाडी पुणे येथे ॲटिव्हा मोटार सायकल सह थांबला आहे. मिळालेल्या बातमी वरुन सदर ठिकाणी सापळा रचुन सलमान हमिद शेख, वय १९ वर्षे, रा. संरगम चाळ, अप्पार डेम्पो मध्ये, बिबवेवाडी पुणे यास ताब्यात घेतले त्याच्याकडे असणाऱ्या मोटार सायकल बाबत चौकशी करता त्याने सदर मोटार सायकल ही कात्रज बसस्टॉप जवळुन चोरी करुन वापरत असल्याबाबत सांगितले. त्यास भारती विदयापीठ पोलीस ठाणेस चोरीच्या गुन्हयात अटक करुन त्याच्याकडे पोलीस कस्टडीत अधिक चौकशी करता त्याने नाना पेठ याठिकाणा वरुन स्प्लेडर मोटार सायकल चोरी केली असल्याबाबत व बिबवेवाडी पोलीस ठाणेच्या हददीत मध्यरात्री बंद असणाऱ्या रांघवेद्र मेडीकल स्टोअर्स येथे व शिप्पा क्लिनीक चे शेटर एकटयाने हाताच्या साहयाने उचकटुन त्यामधील रोख रक्कम चोरी केली असल्याबाबत सांगितले. सदर आरोपी हा पुणे शहरातील मध्यरात्री बंद दुकाने शेटर उचकटुन चोरी करणारा सराईत आरोपी आहे. त्याच्यावर खडक पोलीस ठाणे, कोढवा पोलीस ठाणे येथे गुन्हे दाखल आहे.

सदर कामगिरी परिमंडळ २ पुणे चे पोलीस उपायुक्त श्री पंकज डहाणे सो, सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. शिवाजी पवार सो यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विंजयसिंह गायकवाड, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्रीकांत शिंदे तसेच तपास पथकाचे पोलीस उप-निरिक्षक समाधान कदम सो कर्मचारी सरफराज देशमुख, अमोल पवार, प्रणव संकपाळ, उज्वल मोकाशी, कुंदन शिंदे, अभिजीत रत्नपारखी, गणेश चिंचकर, महेश मंडलीक यांनी केलेली आहे.